# कार्यालय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर

४५, बालभारती (दत्तप्रसाद) धंतोली, नागपूर

फोन. नं. ०७१२-२४२१३९८, ईमेल, dydnapgur@rediffmail.com


जा.क्र. माध्य/ब/स्वअर्थ/ ८९४५ /२०१९

दिनांक 10 OCT 2019

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
गोंदिया होमियोपॅथिक एज्युकेशन सोसायटी,
गोंदिया. जि. भंडारा

**विषय :-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा/**दर्जावाढ** करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-**१) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१९/प्र.क्र.७५२/एसएम-२ दिनांक २७ ऑगष्ट २०१९

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | नविन शाळा/ दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्नता | शाळेचे माध्यम | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गोंदिया | गोंदिया होमियोपॅथिक एज्युकेशन सोसायटी, गोंदिया, जि. भंडारा | लिटिल वुडस इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया, जि. गोंदिया | दर्जावाढ | उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक, (इ.९ वी ते १२ वी) सर्व शाखा | राज्यमंडळ | इंग्रजी | सन २०१९-२० पासून |

<u>अटी व शर्ती</u>

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तुरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानूसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी शासन निर्णयांच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या आत** शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्यबातल ठरेल.**

३. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) शासनाच्या महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

४. संबधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

६. **यु-डायस डाटाः-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नविन शाळा/दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे , संस्थेने, सर्व संबधितांच्या माहितीकरीता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

७. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती** शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**(सतिश मेंढे)**
**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग, नागपूर**

**प्रतिलिपी-**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. आयुक्त (शिक्षण) आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद **गोंदिया** यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
सदर संस्था बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे? याची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.
६. मुख्याध्यापक लिटिल वुडस इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया, जि. गोंदिया यांना माहितीस्तव अग्रेषित.